**धर्मदाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान करण्यासंदर्भातील कार्यपध्दती विहीत करण्याबाबत ...**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१८/प्र.क्र.३८/ज-१,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २५ जूलै, २०१९

**वाचा :-**

१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४०

२) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम-५ व ५०

**प्रस्तावना :-**

सद्य:स्थितीत राज्यात धर्मदाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीय जमीन प्रदान विषयक प्रकरणे हाताळतांना अनुसरावयाची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली नाही. यास्तव धर्मदाय संस्थांना, सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, धर्मशाळा, अनाथालये या किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीयजमिनी भाडेपट्टयाने/ कब्जेहक्काने प्रदान करण्या संदर्भात कार्यपध्दती विहीत करणे गरजेचे आहे.

सदर कार्यपध्दती विहीत करतांना पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

(i) धर्मादाय संस्था या उक्त नमूद प्रयोजनासाठीचे काम सेवाभावी वृत्तीने करत असतात आणि त्यांच्या क्षेत्रातील धर्मादाय स्वरुपाच्या सेवा समाजास उपलब्ध करुन देऊन त्या सेवांबाबतचे राज्यशासनाचे उत्तरदायित्व देखील हलके करीत असतात.

(ii) तसेच, अशा संस्थांना शासकीय जमिनी लिलावाने अथवा पूर्ण बाजार मूल्य आकारुन देण्यात आल्यास, आर्थिक दृष्टया तितक्याशा सबळ नसलेल्या परंतु त्यांच्या क्षेत्रात भरीव योगदान असणाऱ्या संस्थांना विस्ताराची व मोठया प्रमाणावर समाजास सेवा पुरविण्याची संधी मिळणार नाही, त्याच बरोबर उक्त धर्मादाय प्रयोजनासाठी लिलावाने अथवा पूर्ण बाजारमूल्य आकारुन शासकीय जमिनी प्रदान केल्यास अशा संस्थांकडून समाजातील दुर्बल घटकास विनामूल्य अथवा सवलतीच्या दराने सेवा पुरविण्याची अपेक्षा ठेवणे व्यवहार्य राहणार नाही.

उपरोक्त पार्श्वभूमीवर धर्मादाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, धर्मशाळा, अनाथालये किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनांसाठी शासकीय जमिनींचे वाटप/वितरण करण्यासाठीच्या कार्यपध्दती विषयीचे धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



Scanned with OKEN Scanner

**<u>शासन निर्णय</u> :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम,१९७१ यामधील तरतुदींनुसार प्राप्त अधिकारात, धर्मादाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, धर्मशाळा, अनाथालये किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनांसाठी शासकीय जमिनींचे वाटप करण्यासाठी या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत असून त्या अनुषंगाने क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना पुढील प्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत :-

१. **<u>निर्बांध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनींची माहिती संकलित करणे</u> :-** सर्व प्रथम सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्हयामध्ये वाटपासाठी निर्बांध्यरित्या उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनींची गावनिहाय यादी तयार करावी. अशी यादी तयार करतांना सदर जमिनीचा गट नंबर/भुमापन क्रमांक, जमिनीचे क्षेत्रफळ, जमिनीस उपलब्ध असलेला पोच रस्ता यांची माहिती तयार करावी.

२. **<u>निर्बांध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या जमिनींचा विकास आराखडा/प्रादेशिक आराखडा यानुसार वापर तपासणे</u>** :- निर्बांध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या जमिनींचा विकास आराखडा/प्रादेशिक आराखडा यानुसार काय वापर अनुज्ञेय आहे या विषयी प्रत्येक जमिनीची माहिती जिल्हाधिकारी यांनी संबंधित स्थानिक विकास प्राधिकरण, विशेष नियोजन प्राधिकारण अथवा सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त करुन घेऊन वरील १ नुसार बनविलेल्या यादीमध्ये त्या-त्या जमिनीच्या अनुज्ञेय वापराची नोंद त्या-त्या जमिनीच्या माहिती समोर नोंदवावी. एकाच जमिनीचा एकापेक्षा जास्त प्रयोजनासाठी वापर अनुज्ञेय असल्यास तशी नोंद सदर यादी मध्ये घेण्यात यावी.

अशा जमिनीवर विशिष्ठ आरक्षण असेल तर त्या जमिनीचा वापर ते आरक्षण विकसित करण्यासाठीच करण्यात यावा. आरक्षित जमिनीचा विकास करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची/नियोजन प्राधिकरणाची नसल्यासच अशा आरक्षणाखालील जमिनींचा विकास करण्यासाठी जमीन वाटपाचा हेतु प्रसिध्द करण्यात येईल. ज्या आरक्षणांचा विकास करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची/नियोजन प्राधिकरणाची असेल अशा प्रकरणांमध्ये अशा आरक्षणाखालील जमीन संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे / नियोजन प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात येईल.

३. **<u>निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या सरकारी जमिनीबाबत प्रस्ताव शासनास सादर करणे</u> :-** निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनींचा अनुज्ञेय वापर निश्चीत झाल्यानंतर जिल्हाधिकारी अशा जमिनींबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करेल, ज्यामध्ये जमिनीचा तपशिल, तिचा अनुज्ञेय वापर याच बरोबर जर अशा जमिनीबाबत काही मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त झाली असेल तर त्या बाबतचा तपशिल देखील जिल्हाधिकारी अशा प्रस्तावासोबत सादर करेल.



Scanned with OKEN Scanner

४. **जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावाची शासनस्तरावर छाननी :-** जिल्हाधिकारी यांचेकडून निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेल्या जमिनीची तिच्या अनुज्ञेय वापरासह माहिती प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावर अशा माहितीची छाननी करण्यात येईल. छाननी अंती अशा शासकीय जमिनीचा काय वापर करावा याबाबत शासन निर्णय घेईल. असा निर्णय घेतांना व्यापक जनहिताच्या दृष्टीने अशा जमिनीवर कोणती सुविधा उभी राहणे गरजेचे आहे, याबाबत शासन निर्णय घेईल व त्याप्रमाणे सदर जमिनीचा कोणत्या प्रयोजनासाठी वापर करावयाचा हे शासन निश्चित करेल. ज्या प्रयोजनाकरिता अशा शासकीय जमिनीचा वापर करावयाचा आहे व त्यावर जी सुविधा उभी करावयाची आहे, त्याबाबीचा विचार करुन शासन अशा जमिनीच्या प्रदानासाठी व्यक्ती/ संस्था यांच्या पात्रतेच्या अटी प्रकरण निहाय निश्चित करेल. अशा अटी मध्ये व्यक्ती / संस्था यांचा क्षेत्रातील अनुभव, अर्हता, आर्थिक क्षमता, अधिक काळ सुविधा सुरळीत सुरु ठेवण्याची क्षमता इत्यादि बाबींचा समावेश असेल. अशा पध्दतीने संबंधित जमिनीचा संकल्पित वापर व वाटपासाठी व्यक्ती/संस्था यांच्या अर्हतेच्या अटी /शर्ती निश्चित केल्यांनतर शासन संबंधित जिल्हाधिकारी यांना अशा निश्चित केलेल्या प्रयोजनासाठी संबंधित जमीन वाटप करण्याबाबतच्या हेतूस तसेच वाटपास पात्र होण्यासाठी व्यक्ती/संस्था यांच्या पात्रतेच्या अटी/शर्तीस व्यापक प्रसिध्दी देण्याच्या सूचना देईल.

५. **निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या जमिनींच्या वाटपाबाबत आवेदने मागविणे :-**

शासनाने निश्चित करून दिलेल्या प्रयोजनासाठी व संभाव्य अर्जदारांच्या अर्हतेबाबत निश्चित करून दिलेल्या अटी /शर्ती तसेच उपलब्ध असलेल्या जमिनीच्या तपशीलासह जिल्हाधिकारी अशी जमीन त्या विशिष्ठ प्रयोजनासाठी पात्र व्यक्ती/ संस्था यांना वाटप करावयाची आहे या हेतुस व्यापक प्रसिध्दी देईल. त्यासाठी अशा हेतूचे निवेदन जाहिरात स्वरुपात वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्याबरोबरच त्याची जिल्हयातील सर्व तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी तसेच असे प्रयोजन ज्या प्रशासकीय यंत्रणेशी निगडीत असेल त्या प्रशासकीय यंत्रणेच्या जिल्हयातील सर्व महत्वाच्या कार्यालयांमध्ये नोटीस स्वरुपात प्रसिध्द करण्यात यावे. त्याच बरोबर जिल्हाधिकारी कार्यालय, यांच्या संकेतस्थळावर देखील या हेतूस व्यापक प्रसिध्दी दिली जाईल याची जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करावी. अशी प्रसिध्दी देतांना जमिनीचा सर्व आवश्यक तपशील उदा. जमिनीचे क्षेत्रफळ, स्थान, पोहच रस्ता या बाबतची माहिती जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. या प्रसिध्दी मध्ये अशा जमिनीच्या वाटपासाठी पात्रतेच्या आवश्यक अटी, यांचा समावेश असेल तसेच अर्ज कोणत्या तारखेपर्यंत करावा हे देखील त्यात नमूद करण्यात यावे.

जिल्हाधिकारी यांनी एखाद्या जमिनीच्या वाटपासाठी हेतु प्रसिध्द करण्यापूर्वी एखादया व्यक्तीने/संस्थेने सदरहू जमिनीच्या तिच्या अनुज्ञेय वापराच्या प्रयोजनासाठी मागणी केली असल्यास जिल्हाधिकारी यांनी अशा जमिनीच्या वाटपाचा हेतू वर नमूद केल्याप्रमाणे व्यापक प्रसिध्दी देऊन अन्य व्यक्ती /संस्था यांनाही ज्ञात करावा व आवेदने मागवावीत. अशी प्रसिध्दी देण्यापूर्वी या जमिनीच्या वाटपासाठी अर्ज केलेल्या व्यक्ती/संस्था यांना देखील अशा जाहिरातीस /



Scanned with OKEN Scanner

प्रसिध्दीस प्रतिसाद म्हणून नव्याने अर्ज करण्याबाबत लेखी सुचित करावे व पूर्वीचा अर्ज निकाली काढल्याचे देखील कळवावे.

६. **प्राप्त आवेदनांची प्राथमिक छाननी :-** जिल्हाधिकारी यांचेकडे वरील प्रमाणे त्यांनी प्रसिध्द केलेल्या जागा वाटपाच्या हेतुस प्रतिसाद म्हणून विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या सर्व आवेदनांची प्राथमिक छाननी जिल्हाधिकारी यांचे पातळीवर करण्यात यावी. अशी छाननी करतांना अर्ज करण्यासाठी शासनाद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती तसेच पात्रतेच्या निकषांची पूर्तता संबंधित अर्जदार करीत आहे किंवा कसे याची तपासणी जिल्हाधिकारी यांचे पातळीवरुन करण्यात यावी.

७. **प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करणे :-** जिल्हाधिकारी यांनी त्यांना प्राथमिक छाननी मध्ये पात्र आढळलेल्या व्यक्ती/संस्था यांचे अर्ज सर्व कागदपत्रांसह स्वत:च्या विस्तृत/सविस्तर अहवालासह शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त यांना अविलंब पाठवावेत. या प्रस्तावाची आगाऊ प्रत जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावी.

जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची सखोल छाननी विभागीय आयुक्त कार्यालयाने करावी व आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शक्य तितक्या लवकर असा प्रस्ताव शासनास सादर करावा. विभागीय आयुक्त यांना आपल्या छाननी मध्ये जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावामध्ये त्रुटी/ अपूर्तता आढळल्यास अशां त्रुटी/अपूर्ततेचा खुलासा /स्पष्टीकरण तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन प्रस्ताव शासनास सादर करावा. प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय व विभागीय आयुक्त कार्यालय यांचे दरम्यान रेंगाळणार नाही याची दोन्ही कार्यालयांनी काळजी घ्यावी.

८. **शासन स्तरावरील प्रस्तावाची छाननी:-** विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त होणाऱ्या सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, धर्मशाळा, अनाथालये किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनार्थ शासकीय जमीन प्रदानाच्या प्रस्तावांची छाननी शासनस्तरावर खालील प्रमाणे करण्यात यावी:-

**अ)** अशा प्रस्तावामध्ये एकाच व्यक्तीचा/संस्थेचा अर्ज प्राथमिक छाननी मध्ये प्राप्त झाला असल्यास अशा प्रस्तावाची विभागाने सखोल तपासणी करावी. अशी तपासणी /छाननी करतांना सदर जागेच्या वापराच्या शासनाने निश्चित केलेल्या प्रयोजनाचा हेतू प्रस्तावित जमीन प्रदानातून साध्य होत असल्याची खात्री करावी. तद्वतच अशा जमीन वाटपासाठी इच्छुक असणारी व्यक्ती/संस्था शासनाने या जमीन प्रदानासाठी निश्चित केलेल्या पात्रतेच्या अटी /शर्तीची पूर्तता करत आहे किंवा नाही याची देखील तपासणी करण्यात यावी. त्यानंतर वापराचे प्रस्तावित प्रयोजन ज्या विभागाशी संबंधित आहे, त्या विभागाचा नस्तीवर सल्ला घेऊन व जमिनीच्या किंमतीच्या अनुषंगाने आवश्यकता असल्यास वित्त विभागाचा सल्ला घेऊन महसूल व वन विभागाने उचित प्रस्ताव शासनास सादर करावा. शासनस्तरावरील छाननी मध्ये जमीन वाटपासाठी सदरहू व्यक्ती/संस्था अपात्र आढळल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव सदरहू जमीन/भुखंड संबंधित व्यक्तीस/संस्थेस प्रदान करणे शक्य नसल्यास तसे शासनाच्या मान्यतेने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत अर्जदार व्यक्ती/संस्था यांना त्या बाबतच्या कारणांसह



Scanned with OKEN Scanner

लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. शासन स्तरावरील छाननी मध्ये अशी व्यक्ती/संस्था भुखंड वाटपासाठी पात्र आढळल्यास शासन मान्यतेने आवश्यक आदेश उचित अटी व शर्तीसह निर्गमित करण्यात यावेत.

**आ)** विभागीय आयुक्त यांचे मार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये एका पेक्षा अधिक व्यक्ती /संस्था यांचे अर्ज प्राथमिक छाननीमध्ये पात्र आढळल्यास महसूल विभागाच्या स्तरावर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

i. अशा प्रस्तावाच्या छाननी साठी सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांचे अध्यक्षेतेखाली एक समिती असेल, ज्यामध्ये सचिव/प्रधान सचिव वित्त विभाग, नगरविकास विभाग (नवि-१) तसेच ज्या प्रयोजनासाठी जमीन प्रदान करावयाची आहे त्या प्रयोजनासाठी शासनातील संबधीत प्रशासकीय विभागाचे सचिव/ प्रधान सचिव यांचा समावेश असेल. महसूल व वन विभागातील संबंधित उप सचिव/सह सचिव अशा समितीचा सदस्य सचिव म्हणून काम पाहील.

ii. प्रस्तावित जमीन प्रदानासाठी शासनाने निश्चित केलेल्या अटी व शर्तींच्या आधारे सदर समिती प्राथमिक दृष्टया पात्र अर्जांची छाननी करुन पात्र अर्जदारांची क्रमवारी ठरवेल व समितीची शिफारस विभागास सादर करेल. प्राप्त पात्र अर्जांचे मूल्यांकन अर्जदार व्यक्ती / संस्था यांचा क्षेत्रातील अनुभव, अर्हता, आर्थिक क्षमता, विश्वासार्हता, पूर्वेतिहास, सुविधा अधिककाळ सुरू ठेवण्याची क्षमता इत्यादी बाबीच्या आधारे करण्यात यावे.

iii. समितीच्या शिफारशींच्या आधारे जमीन प्रदानाचा प्रस्ताव विभागाकडून शासनास रितसर मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

iv. विभागाने सादर केलेल्या अशा प्रस्तावावर समितीच्या शिफारशींचा विचार करुन शासन उचित निर्णय घेईल. शासनाचा निर्णय समितीच्या शिफारशींशी सुसंगत नसेल किंवा समितीच्या शिफारशी विरुध्द असेल तर त्या बाबतची कारणे लेखी स्वरुपात नमूद करण्यात यावीत.

v. शासनाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर जमीन प्रदानाचे आदेश योग्य त्या अटी/शर्तीसह पारीत करण्यात यावेत.

vi. एखादी जमीन एखादया प्रयोजनासाठी वाटप करण्याचा हेतू जाहीर केल्यानंतर त्या जमिनीचे वाटप करणे शासनावर बंधनकारक असणार नाही. सदर वाटपाची प्रक्रिया शासन कोणत्याही स्तरावर रद्द करु शकेल.

vii. जिल्हाधिकारी यांच्या प्राथमिक छाननीमध्ये अपात्र ठरलेल्या तसेच शासनस्तरावर ज्यांची जमीन प्रदानाची विनंती अमान्य करण्यात आली आहे, अशा सर्व अर्जदारांना जिल्हाधिकारी यांचेकडून लेखी स्वरूपात त्या बाबत कळविण्यात यावे.

९. **<u>अतिविशेष गुणवत्ताधारक किंवा अपवादात्मक ख्यातनाम व्यक्ती / संस्था यांना शासकीय जमीन प्रदान करणे</u> :-** अतिविशेष गुणवत्ता धारण केलेल्या किंवा ख्यातनाम व्यक्ती अथवा संस्थेने शासकीय जमिनीच्या वापराच्या अनुज्ञेय प्रयोजनाशी सुसंगत प्रयोजनासाठी शासनाकडे अर्ज करुन जमिनीची



Scanned with OKEN Scanner

मागणी केली असेल तर अशा प्रसंगी त्या जमिनीच्या वाटपासाठी जाहीर प्रसिध्दी देऊन अन्य व्यक्ती / संस्था यांची आवेदने न मागविता शासन जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित जमिनीविषयी अहवाल मागवून घेऊन अशा अतिविशेष गुणवत्ताधारक किंवा ख्यातनाम व्यक्ती / संस्था यांना त्या प्रयोजनासाठी जमिनीचे थेट वाटप करण्याचा निर्णय घेऊ शकेल. मात्र असे थेट जमीन वाटप करण्याचा निर्णय घेतांना अशी व्यक्ती / संस्था ही संबंधीत क्षेत्रामध्ये अतिविशेष गुणवत्ताधारक किंवा ख्यातनाम असल्याबाबतची कारणे शासन नमूद करेल, ज्यामध्ये अशा व्यक्ती / संस्थेने राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेली कामगिरी, अशा व्यक्ती / संस्थेस प्राप्त सन्मान / पुरस्कार, त्यांनी केलेले कार्य इत्यादी बाबींचा समावेश राहील. अतिविशेष गुणवत्ताधारक किंवा ख्यातनाम व्यक्ती / संस्था यांनी व्यापक समाज हिताच्या दृष्टीने नव्याने स्थापन केलेल्या संस्थेस देखील या पध्दतीने त्यांच्या थेट अर्जाच्या अनुषंगाने जमीन प्रदान करता येईल.

अतिविशेष गुणवत्ताधारक किंवा ख्यातनाम व्यक्ती / संस्था यांनी शासकीय जमीन प्रदानासाठी अर्ज केल्यानंतर त्यांना थेट पध्दतीने शासकीय जमीन प्रदान करणे शासनावर बंधनकारक असणार नाही व हा शासनाचा स्वेच्छा अधिकार असून अपवादात्मक परिस्थितीत शासनास कारणे नमूद करुन सदर स्वेच्छाधिकाराचा वापर करता येईल.

१०.**<u>संशोधन कार्य करणाऱ्या किंवा करु इच्छिणाऱ्या संस्था व समाजातील वंचित व दुर्बल घटकांसाठी तथा दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्था यांना शासकीय जमीन प्रदान करणे</u> :-** विविध क्षेत्रात संशोधन कार्य करणाऱ्या किंवा करु इच्छिणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती यांना त्यांचे संशोधन कार्य करण्यासाठी तसेच समाजातील वंचित व दुर्बल घटकासाठी तथा दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती / संस्था यांना त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी शासकीय जमिनीची आवश्यकता असल्यास व अशा जमिनीची मागणी त्यांनी थेट शासनाकडे केल्यास शासन सदर जमिनीबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून अहवाल मागवून व प्रस्तावाची तपासणी करुन अपवादात्मक प्रकरणांमध्ये अशा व्यक्ती / संस्था यांना शासकीय जमीन थेट प्रदान करु शकेल.

संशोधन कार्य करणाऱ्या / करु इच्छिणाऱ्या संस्था, समाजातील दुर्बल, वंचित घटकासाठी तथा दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या संस्था यांनी अशा प्रकारे मागणी केलेली शासकीय जमीन प्रदान करणे शासनावर बंधनकारक असणार नाही व हा शासनाचा स्वेच्छा अधिकार असेल ज्याचा शासन अपवादात्मक प्रकरणांत वापर करू शकेल.

११.**<u>उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शैक्षणिक संस्थांना, संस्था कार्यरत असलेल्या जमिनीच्या शेजारील शासकीय जमीन आवश्यक असल्यास करावयाची कार्यवाही</u>** :- उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शैक्षणिक संस्थांना संबंधित केंद्रीय नियामक प्राधिकरणाच्या निकषांप्रमाणे जमिनी उपलब्ध होण्यासाठी शैक्षणिक संस्था कार्यरत असलेल्या जमिनीच्या शेजारील शासकीय जमीन आवश्यक असेल व संस्थेने अशा जमिनीची शासनाकडे थेट मागणी केली असेल तर अशा मागणी केलेल्या जमिनीबाबत जिल्हाधिकारी यांचा अहवाल प्राप्त करुन घेऊन अशा शैक्षणिक संस्थेला संबंधित केंद्रीय नियामक संस्थेचे क्षेत्र विषयक निकष पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या उर्वरित जमिनी



Scanned with OKEN Scanner

इतकी शासकीय जमीन थेट प्रदान करण्याबाबत शासन निर्णय घेऊ शकेल. मात्र अशा शैक्षणिक संस्थेने केलेली मागणी प्रदान करणे शासनावर बंधनकारक असणार नाही.

१२. **शासनाकडे पूर्वीपासून दाखल असलेल्या प्रस्तावासंदर्भातील कार्यवाही:-** प्रस्तुतचे धोरण ज्या तारखेपासून अंमलात येईल, त्या तारखेला सांस्कृतिक/वैद्यकीय/शैक्षणिक/ सामाजिक/धर्मशाळा व अनाथालय या किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनार्थ शासकीय जमीन वाटपाचे शासनस्तरावर विचाराधीन असलेले सर्व प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात यावेत व या धोरणाप्रमाणे जमीन वाटपाची प्रक्रीया सुरु करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्यात यावेत. मात्र, ज्या प्रकरणांमध्ये जमीन वाटपाबाबत शासनाने पूर्वीच हेतूपत्र निर्गमीत केलेले असेल अशा प्रकरणांमध्ये जमीन प्रदान करतांना हया धोरणातील तरतुदी लागू होणार नाहीत व थेट जमीन वाटप करण्यात येईल. संबंधित जिल्हाधिकारी यांनी अर्जदारांना या प्रयोजनाचा जमीन मागणीचा अर्ज दप्तरी दाखल केला असून सदरहू व्यक्ती/ संस्थेने जिल्हाधिकारी यांनी अशी जमीन वाटपासाठी प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीस प्रतिसाद म्हणून जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिल्याप्रमाणे अर्ज करण्याबाबत कळविण्यात यावे.

१३. राज्य किंवा केंद्र शासनाचे विभाग, उपक्रम, महामंडळे किंवा स्थानिक स्वराज्यसंस्था यांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी आवश्यक शासकीय जमिनीचे थेट वाटप करता येईल.

१४. प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने शासकीय जमिनीचे कब्जेहक्काने/भाडेपट्टयाने प्रदान करतांना अशा वाटपाबाबत त्या-त्या वेळी प्रचलित असलेल्या तरतुदीप्रमाणे कब्जेहक्काची/भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करण्यात यावी.

०२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३७३/ व्यय-९/ २०१८, दि. १६ ऑक्टोबर, २०१८ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२५१५२८३३२८१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**रमेश चव्हाण**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव , विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

८) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जी.टी. रूग्णालय परिसर, मुंबई.
११) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, जी.टी. रूग्णालय परिसर, मुंबई.
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१५) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१६) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.
१७) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१९) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
२०) सर्व विभागीय आयुक्त.
२१) सर्व जिल्हाधिकारी.
२२) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२३) सर्व अवरसचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५) निवासी लेखाधिकारी, मुंबई.
२६) उपसचिव (ज-१), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७) निवड नस्ती ( ज-१).

******



Scanned with OKEN Scanner